# वेणूताई चव्हाण कॉलेज, कराड.

## मराठी विभाग

## सन २०२४- २०२५

दिनांक- २५/०२/२०२५

### सूचना

वरिष्ठ महाविद्यायातील सर्व विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, मराठी विभाग आयोजित गुरुवार दि. २७ फेब्रुवारी, २०२५ रोजी सकाळी ९ वाजता **'मराठी भाषा गौरव दिन व कवी वि. वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांच्या जयंती'** निमित्त व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. तरी सर्व विद्यार्थ्यांनी व प्राध्यापकांनी सकाळी ठिक ८.३० वाजता पोर्चमध्ये प्रतिमा पूजनासाठी व ले. हॉ. क्र.२१ मध्ये व्याख्यानास वेळेत उपस्थित रहावे.

मराठी विभाग प्रमुख

प्र. प्राचार्य

प्रभारी प्राचार्य,
वेणूताई चव्हाण कॉलेज
कराड

Scanned with CamScanner

|| जे का रंजले गांजले | त्यांसी करूया आपुले ||

श्री शिवाजी शिक्षण संस्था, कराडच्या उच्च शिक्षण मंडळ, कराडचे

# वेणूताई चव्हाण कॉलेज, कराड

मराठी विभाग (२०२४-२५)

## वि. वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज व मराठी भाषा गौरव दिन समारंभ

## -अहवाल-

दि. २७ फेब्रुवारी हा दिवस वि.वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांच्या जयंती दिनी मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरा केला जातो. मराठी विभागाच्यावतीने २७ फेब्रुवारी, २०२५ रोजी सकाळी ठीक ८ वाजता कुसुमाग्रज यांच्या जयंती निमित्ताने महाविद्यालयाच्या पोर्चमध्ये महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य डॉ. एस. आर. सरोदे यांच्या शुभहस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्रा. डॉ. गवाराम पोटे उपस्थित होते. याप्रसंगी सर्व प्राध्यापकांनी व विद्यार्थ्यांनी पुष्प वाहून प्रतिमा पूजन करण्यात आले. यानंतर प्रमुख पाहुणे प्रा. डॉ. गवराम पोटे यांच्या शुभहस्ते मराठी भाषेची बदलती रूपे या विषयावरील भित्तीपत्रिकेचे प्रकाशन करण्यात आले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत प्रा. प्रदीप चोपडे यांनी केले. प्रमुख पाहुण्यांची ओळख प्रा. वसीम आंबेकरी यांनी केले. मार्गदर्शन करताना प्रमुख पाहुणे मा. प्रा. डॉ. गवराम पोटे म्हणाले कि, “मराठी भाषेला अभिजित भाषेचा दर्जा मिळाला आहे. मराठी माणसांचे कित्येक वर्षाचे स्वप्न यामुळे पूर्ण झाले आहे. त्यासाठी अनेक लोकांनी प्रयत्न केले, त्याला यश मिळाले. मराठी प्राचीन काळापासून बोली रुपामध्ये अस्तित्वात होती. नंतर ती लिपीबद्ध होऊन ग्रांथिक रूपाने पहावयास मिळते. 'गाथा सप्तशती' मध्ये मराठीचे पुरावे आढळतात. तसेच प्राचीन काळात अनेक शिलालेख, ताम्रपट या भाषेत लिहिले गेले आहेत. मराठी भाषेला संतांनी सर्वसामान्यांची भाषा बनवली. भक्तीला साहित्यामधून आविष्कृत केले. भाषेमुळे जीवन व्यवहार सोपे होतात. पण आज ही भाषा ज्ञान भाषा बनविणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे.”

अध्यक्षस्थानी प्रा. डॉ.आर.आर. थोरात सर होते. ते म्हणाले, “कुसुमाग्रज हे मराठी साहित्यातील थोर साहित्यिक होते. ज्ञानपीठ पुरस्कार विजेते कुसुमाग्रजांनी कविता, कथा, नाटक, लेख आणि विविध ग्रंथांना प्रस्तावना लिहून आपले नाव अजरामर केले आहे. त्यांनी सामाजिक क्षेत्रामध्ये ही आदर्श काम केले आहे. त्यांच्या जन्मदिनी आपण 'मराठी राजभाषा गौरव दिन' आयोजित करतो. सर्वांनी मराठी भाषेचा अधिकाधिक वापर करणे गरजेचे आहे. जो मनुष्य अधिक भाषा शिकतो तो जीवनामध्ये यशस्वी होतो. महात्मा गांधींना ७७ भाषा समजत होत्या. डॉ बाबासाहेब आंबेडकर हे सात भाषा शिकले होते. एपीजे अब्दुल कलाम पाच भाषा बोलू शकत होते. अनेक वैज्ञानिकांनी अधिकाधिक भाषांचा वापर करून ज्ञान संपादन केले आहे. आपण ही अधिकाधिक भाषा शिकणे महत्त्वाचे आहे. कोणतीही भाषा दुसऱ्या भाषेची स्पर्धक नसते हे आपण जाणले पाहिजे”.

सूत्रसंचालन श्री. सुदर्शन वर्दे आणि आभार प्रा. अशोक माळी यांनी मानले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील विद्यार्थी, विद्यार्थिनी, प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचारी उपस्थित होते.

स्थळ- मराठी विभाग, वेणूताई चव्हाण कॉलेज, कराड.

दिनांक- २७ फेब्रुवारी, २०२५

-----------------------------------------------------------------------

-----

SPU

प्रभारी प्राचार्य,
वेणूताई चव्हाण कॉलेज,
कराड.

Scanned with CamScanner

|| जे का रंजले गांजले | त्यांसी करूया आपुले ||

श्री शिवाजी शिक्षण संस्था, उच्च शिक्षण मंडळ, कराडचे



# वेणूताई चव्हाण कॉलेज, कराड

## मराठी विभाग आयोजित

## मराठी भाषा गौरव दिन

व

## कवी वि. वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज जयंती

(२७ फेब्रुवारी, २०२५)

# कार्यक्रम पत्रिका

- प्रास्ताविक : प्रा. संतोष बोंगाळे
- पाहुण्यांचा परिचय : प्रा. वसीम आंबेकरी
- प्रमुख पाहुण्यांचे मार्गदर्शन : प्रा. डॉ. गवाराम पोटे
  (मराठी विभाग प्रमुख,
  काकासाहेब चव्हाण महाविद्यालय, तळमावले)
- अध्यक्ष : प्रा. (डॉ.) श्रीमती एस. आर. सरोदे
  (प्रभारी प्राचार्य, वेणूताई चव्हाण कॉलेज, कराड)
- आभार : प्रा. पी. एस. चोपडे
- सूत्रसंचालन : कु. शिवांजली जाधव

---

मंगळवार, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२४

वेळ- सकाळी ९. ०० वा.

स्थळ- ले. हॉ. क्र.२१ वेणूताई चव्हाण कॉलेज, कराड.

Scanned with CamScanner

Estd - 1st May, 1971

|| Be one with the downtrodden and the underprivileged ||

**Shri Shivaji Education Society, Vidyanagar, Karad's**

**Board For Higher Education Vidyanagar, Karad.**

# VENUTAI CHAVAN COLLEGE, KARAD

# वेणूताई चव्हाण कॉलेज, कराड



Affiliated to Shivaji University, Kolhapur

Jr. College - UDISE Code - 27310207714, Index No J. 21-02-001 (Arts & Com.) J. 21-02-901 (MCVC)

Accredited "B" Grade (3rd Cycle) by NAAC, Bengaluru

An ISO 9001:2015 Certified College CR. NO. 20200206001 GS

- Address : Vidyanagar, Karad. Dist. Satara (Maharashtra) Pin : 415 124
- Phone : (02164) 271619, 271119
- Email : principalvcck@gmail.com, vck157.c@unishivaji.ac.in
- Website : www.vckarad.com


जा.क्र. [illegible] २०२४/२५

दिनांक २५/०२/२०२५

प्रति,

प्रा. डॉ. गवाराम पोटे

मराठी विभाग प्रमुख,

काकासाहेब चव्हाण महाविद्यालय,

तळमावले

विषय- मराठी भाषा गौरव दिन व कवी वि. वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांच्या जयंती निमित्त आयोजित कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणेबाबत...

महोदय,

वरील विषयास अनुसरून आमच्या महाविद्यालयात मराठी विभाग आयोजित 'मराठी भाषा गौरव दिन व कवी वि. वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांच्या जयंती' निमित्त कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून गुरुवार दि. २७ फेब्रुवारी, २०२५ रोजी सकाळी ८.३० वाजता महाविद्यालयात उपस्थित रहावे. व आमच्या विद्यार्थांना मार्गदर्शन करावे, ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

प्रभारी प्राचार्य,

वेणूताई चव्हाण कॉलेज,

कराड


Scanned with CamScanner

Estd - 1st May, 1971
II Be one with the downtrodden and the underprivileged II
Shri Shivaji Education Society, Vidyanagar, Karad's
Board For Higher Education Vidyanagar, Karad.

# VENUTAI CHAVAN COLLEGE, KARAD

# वेणूताई चव्हाण कॉलेज, कराड



Affiliated to Shivaji University, Kolhapur
Jr. College - UDISE Code - 27310207714, Index No J. 21-02-001 (Arts & Com.) J. 21-02-901 (MCVC)
Accredited "B" Grade (3rd Cycle) by NAAC, Bengaluru
An ISO 9001:2015 Certified College CR. NO. 20200206001 GS

Address : Vidyanagar, Karad. Dist. Satara (Maharashtra) Pin : 415 124
Phone : (02164) 271619, 271119
Email : principalvcck@gmail.com
vck157.cl@unishivaji.ac.in
Website : www.vcckarad.com

जा.क्र. ६७७/२०२४/२५ दिनांक २७ /०२/२०२५

प्रति,

प्रा. डॉ. गवाराम पोटे

मराठी विभाग प्रमुख,

काकासाहेब चव्हाण महाविद्यालय,

तळमावले

## आभार पत्र

महोदय,

आमच्या महाविद्यालयात मराठी विभाग आयोजित 'मराठी भाषा गौरव दिन व कवी वि. वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांच्या जयंती' निमित्त कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून आपण गुरुवार दि. २७ फेब्रुवारी, २०२५ रोजी उपस्थित राहून आमच्या विद्यार्थांना मौलिक मार्गदर्शन केले. या बद्दल महाविद्यालयातर्फे आपले हार्दिक आभार.

कळावे,

आपला विश्वासू,

प्रभारी प्राचार्य,
वेणूताई चव्हाण कॉलेज,
कराड

Scanned with CamScanner

## वि. वा शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज व मराठी भाषा गौरव दिन समारंभ
## काही क्षणचित्रे



प्रतिमा पूजन प्रसंगी मा. प्राचार्य प्रा. (डॉ.) श्रीमती एस. आर. सरोदे



प्रतिमा पूजन प्रसंगी प्रमुख पाहुणे मा. डॉ. गवाराम पोटे

Scanned with CamScanner




प्रमुख पाहुणे मा. गवाराम पोटे यांचे स्वागत करताना
कार्याक्रमाचे अध्यक्ष  डॉ. आर. आर. थोरात




कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. डॉ. आर. आर. थोरात यांचे
स्वागत करताना प्रा. व्ही. आय. आंबेकरी

Scanned with CamScanner




प्रास्ताविक करताना प्रा. पी. एस. चोपडे




पाहुण्यांचा परिचय करून देताना प्रा. व्ही. आय. आंबेकरी

Scanned with CamScanner




प्रमुख पाहुणे मा. डॉ. गवराम पोटे मार्गदर्शन करताना




अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना मा. डॉ. आर. आर. थोरात

Scanned with CamScanner




सूत्रसंचालन करताना विद्यार्थी श्री सुदर्शन वर्दे



भित्तीपत्रकाचे प्रकाशन करताना प्रमुख पाहुणे मा. डॉ. गवाराम पोटे




Scanned with CamScanner

# नियतकालिकात प्रसिध्द झालेली कार्यक्रमाची बातमी

## मराठी ही लोकभाषेबरोबरच ज्ञानभाषा व्हावी : प्रा.डॉ.गवाराम पोटे

**कराड : हॅलो प्रभात**

'मराठी भाषेला अभिजित भाषेचा दर्जा मिळाला आहे . मराठी माणसांचे कित्येक वर्षाचे स्वप्न यामुळे पूर्ण झाले आहे. त्यासाठी अनेक लोकांनी प्रयत्न केले, त्याला यश मिळाले. मराठी प्राचीन काळापासून बोली रुपामध्ये अस्तित्वात होती.

नंतर ती लिपीबद्ध होऊन ग्रांथिक रूपाने पहावयास मिळते. 'गाथा सप्तशती' मध्ये मराठीचे पुरावे आढळतात. तसेच प्राचीन काळात अनेक शिलालेख, ताम्रपट या भाषेत लिहिले गेले आहेत. मराठी भाषेला संतांनी सर्वसामान्यांची भाषा बनवली. भक्तीला साहित्यामधून आविष्कृत केले. भाषेमुळे जीवन व्यवहार सोपे होतात.



पण आज ही भाषा ज्ञान भाषा बनविणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. असे प्रतिपादन प्रा. डॉ. गवाराम पोटे यांनी केले. वेणूताई चव्हाण कॉलेज, कराड येथे 'मराठी भाषा गौरव दिना' व वि. वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांच्या जयंती निमित्त मराठी विभाग आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

अध्यक्षस्थानी प्रा.डॉ.आर. आर. थोरात सर होते. ते म्हणाले, ' कुसुमाग्रज हे मराठी साहित्यातील थोर साहित्यिक होते. ज्ञानपीठ पुरस्कार विजेते कुसुमाग्रजांनी कविता, कथा, नाटक, लेख आणि विविध ग्रंथांना प्रस्तावना लिहून आपले नाव अजरामर केले आहे. त्यांनी सामाजिक क्षेत्रामध्ये ही आदर्श काम केले आहे. त्यांच्या जन्मदिनी आपण 'मराठी राजभाषा गौरव दिन' आयोजित करतो. सर्वांनी मराठी भाषेचा अधिकाधिक वापर करणे गरजेचे आहे. जो मनुष्य अधिक भाषा शिकतो तो जीवनामध्ये यशस्वी होतो. महात्मा गांधींना ७७ भाषा समजत होत्या. डॉ बाबासाहेब आंबेडकर हे सात भाषा शिकले होते. एपीजे अब्दुल कलाम पाच भाषा बोलू शकत होते. अनेक वैज्ञानिकांनी अधिकाधिक भाषांचा वापर करून ज्ञान संपादन केले आहे. आपण ही अधिकाधिक भाषा शिकणे महत्त्वाचे आहे. कोणतीही भाषा दुसऱ्या भाषेची स्पर्धक नसते हे आपण जाणले पाहिजे'.

कार्यक्रमाची सुरुवात प्रभारी प्राचार्य प्रा. डॉ. श्रीमती एस.आर. सरोदे यांच्या हस्ते कुसुमाग्रजांच्या प्रतिमेचे पूजन करून झाले. त्यानंतर मराठी विभागातर्फे 'मराठी भाषेची बदलती रूपे' या विषयावर भितीपत्रिकेचे प्रकाशन झाले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. प्रदीप चोपडे यांनी केले. पाहुण्यांची ओळख प्रा. वसीम आंबेकरी यांनी केले. सूत्रसंचालन कुमार. सुदर्शन वर्दे आणि आभार प्रा. अशोक माळी यांनी मानले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील विद्यार्थी, विद्यार्थिनी, प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचारी उपस्थित होते.

Scanned with CamScanner